

# फिडिंग गॅस्ट्रोटॉमी म्हणजे काय?

Dr Sanjay Salunkhe


**फिडिंग गॅस्ट्रोटॉमी टयुब म्हणजे काय?**


रूग्णाच्या पोटात परस्पर नळीव्दारे अन्न पुरवठा करणारी नळी. यामध्ये नळीचे एक तोडं पोटात (जठरात) तर दुसरे पोटाबाहेर असते.याव्दारे पातळ अन्न जठरात सोडले जाते.पोटाच्या आत असणाऱ्या नळीवर सिलीकॉन रिटेंनशन प्लेट असते आणि त्वचेवर जेथे नळी बाहेर येते तेथे सिलीकॉन फिक्सेशन प्लेट (पांढऱ्या रंगाची)असते.






यामुळे नळी अचानक निसटुन बाहेर येत नाही. नळी वापरत नसताना चिमटा वापरता येतो अन्न पुरवठा करणाऱ्या बाजूला २ प्रकारचे ॲडाप्टर असतात युनिव्हरसल फिडिंग ॲडाप्टर (निळया / जांभळया रंगाचे )हे इंजेक्शनची सिरिंज किंवा फिडींग फनेल (नरसाळे)साठी असते.





फनेल कनेक्टर (जांभळया रंगाचे )हे नरसाळे जोडणी साठी वापरता येते.



---

**फिडींग कसे करावं?**

Dr Sanjay Salunkhe

तुम्ही संपुर्णपणे स्वावलंबी राहुन स्वत:फिड घेवु शकता.जास्त क्षमतेची सिर्रीज हाताळण्याची सवय करून घ्यावी.ज्याप्रमाणे परिचारीका सिर्रीज हाताळतात त्याप्रमाणे तुम्हीही करू शकता.फिड सिरिंजने शोषुन मग सिर्रीजचे पिस्टन काढुन मग फिड नरसाळयातून ओतल्या सारखे वापरावे. सिरिंज पोटापासून कमीत कमी ४-५ इंच वर राहील अशी धरावी म्हणजे गुरूत्वाकर्षणाने फिड खाली परस्पर पोटात जाईल. नेहमी फिड घेण्यापूर्वी व नंतर हात स्वच्छ धूवून घ्यावेत फिड नेहमी बसुन किंवा टेका लावून बसल्या स्थीतीत घ्यावे. झोपून फिड घेवू नये. फिड सुरू करण्यापूर्वी २०ml पाणी टाकून नळीतील मार्ग मोकळा आहे का ते तपासावे फिड घेऊन झाल्यावर सुध्दा नळी २०ml पाण्याने साफ करावी आणि नळी स्वच्छ दिसेल कोणत्याही प्रकारचे अन्न कण त्यात नाही आणि मार्गात अडथळा नाही याची खात्री करुन घ्यावी. फिडसाठी वापरात येणाऱ्या सर्व वस्तु स्वतः धुवून स्वच्छ कराव्यात नाहीतर किटाणुमुळे जुलाब होण्याची शक्यता असते.जर सिर्रीजचे पिस्टन बसवताना खुप घट्ट होत असेल तर त्यावर खादयतेल लावावे म्हणजे ते वापरण्यास सोपे होईल.



Dr Sanjay Salunkhe

**फिड २ प्रकाचे असावे**

१)पाण्यासारखे पातळ पदार्थ परस्पर सिर्रीजमध्ये ओतुन देता येते गुरुत्वाकर्षणाने ते खाली पोटात जाते.

२)जाडसर द्रव पदार्थ-प्रथम सिर्रीजमध्ये शोषुन मग नळीत सोडावे.

कोणतेही पदार्थ नळीव्दारे घेतल्यानंतर २०ml पाण्याने नळी साफ करावी. फिड घेतल्यानंतर जर छातीत जळजळ ॲसिडीटी,मळमळ किंवा उल्टी झाली तर फिड हळुवार पणे घ्यावे किंवा कमी प्रमाणात घ्यावे. नळीने फिड सुरु केल्यानंतर संडासला पातळ होऊ शकते किंवा एखादी खेप वाढू शकते.

Dr Sanjay Salunkhe

**मी नळीची काळजी कशी घ्यावी ?**

शस्त्रक्रियेनंतर सात दिवसांपर्यंत डॉक्टर ड्रेसिंग बघतात म्हणुन काळजी करण्याची गरज नाही.

सात दिवसानंतर रिटेंशन प्लेट सैल केली जाते म्हनजे आतील रिटेंशन प्लेट आणी बाहेरील फिक्सेशन प्लेट मध्ये खेळती राहिल आणी पातळ ड्रेसिंग करता येईल.

चार दिवसानंतर तुम्ही डोक्यावरुन आंघोळ घेऊ शकता.नळी जवळील भाग साबणाने स्वच्छ धुवून टॅवेल ने कोरडा करावा.नळी जवळील त्वचेवर ओलावा राहु नये म्हणुन ती जागा स्पिरीट ने स्वच्छ करावी म्हणजे ती कोरडी होईल.

दर २-३दिवसांनी फिक्सेशन प्लेट सैल करुन नळी ३-४ सें.मी.आत ढकलुन थोडी फिरवून हलका ताण देवून ड्रेसिंग केले जाते हे तुम्ही डॅक्टरांकडुन शिकुन घरीही करु शकता.

ड्रेसिंगसाठी किंवा इतर कोणतेही मलम नळीवर किंवा बाजुने लावु नये.त्याने नळीची सक्षमता कमी होते नळीची गळती होऊन कपडे खराब होवु नये म्हणुन नळीचे तोंड व्यवस्थित बंद आहे ना याची खात्री करुन घ्यावी.कारण एकदा फिड घेतल्यानंतर २-३ तांसासाठी जठरातच असते. यानंतर नळी कोणत्याही स्थितीत ठेवली तरी चालते.फक्त नळीवर कोणत्याही प्रकारे ताण येता कामा नये. नळी आत असताना तुम्ही पोटावर झोपु शकता.

---

**फिड कसे निवडावे ?**

फिड कसे निवडावे,कोणत्यावेळेला काय आणि किती प्रमाणात घ्यावे या विषयी आहारतज्ञांचा सल्ला घेणेच योग्य ठरेल.जसे काही पदार्थ रात्री ॲसिडीटी निर्माण करतात.आपणास द्रव स्वरुपातील पदार्थच फिड मध्ये घेण्याचे बंधनकारक असते. म्हणुन जे सहज उपलब्ध असेल उदा-दुध,फळाचा रस,हेच घेतले जाते आणि काहीना यामुळे क्षमतेपेक्षा जास्त घेतल्याने जुलाब होण्याची शकयता असते.ज्या पदार्थामंध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते असे पदार्थ घेतल्याने आळसल्यासारखे किंवा झोपावेसे वाटेल. जास्त जाडसर पदार्थ पोटात जास्त वेळ राहिल्याने दगडासारखे बसतात.दिलेले फिड जर व्यवस्थित वाहत नसेल तर आहारतज्ञांना या विषयी विचारावे. स्वत:फिड पातळ केल्याने पोषकता कमी होते.काही व्यक्तींसाठी पाण्याचे प्रमाण किती असावं यावरही बंदी असते. ४-६तास बाहेर ठेवलेले फिड घेवु नये.त्याने जुलाब होण्याची शकयता असते.

---

**नळी बंद पडु शकते का ?**

वेगवेगळया प्रकारचे खादयपदार्थ आणि औषधामंध्ये रासायनिक पदार्थ असतात काही पदार्थ लगेच गोठतात किंवा एकमेकांत मिसळयानंतर गोठतात म्हणुन नेहमी २ प्रकारच्या पदार्थामंध्ये नळी साफ करावी.२ पदार्थ एकत्र घेवु नये फळाचा रस (सायीट्रीक ॲसिड)चहा हे रोजच्या आहारातील पदार्थ आहे.ज्यामुळे नळी खराब होवु शकते. दुध,ताक,साय किंवा लोणी याचे फिड घेण्यापुर्वी ते गाळुन घ्यावे. पित्तनाशक औषधे खादयपदार्थामंध्ये मिसळुन घेवु नये.जेव्हा तुम्ही कुठल्याही दुसऱ्या समस्येसाठी डॉक्टरांकडे जाता तेव्हा त्यांना पातळ स्वरुपातील औषधे दयावयास सांगावे. कॅपसुल स्वरुपातील औषधे कशी घ्यावीत हे तुम्हांला डॉक्टर सांगु शकतील. खोकल्यासाठीच्या काही औषधांमध्ये अल्कोहल असते म्हणुन नळीच्या सुरक्षेसाठी ती प्रत्येकवेळी साफ करावी. जर नळी बंद पडली तर ती गरम पाण्यने साफ करणे किंवा पिण्याचा सोडा अथवा पेप्सी सारखे पदार्थ वापरावे.यात असणाऱ्या कार्बनयुक्त पदार्थामुळे नळी मोकळी होते. सिरींजने जास्त दाब देवुन किंवा तारेने स्वच्छ करण्याचे टाळावे.त्याने ती पुर्ववत होत नाही.अशावेळी डॉक्टर तुम्हांला नवी नळी आणावयास सांगतील फक्त तुम्हीच या गरज नसलेल्या गोष्टी घडण्यापासुन वाचवु शकता.

---

**अडचणीच्या वेळी येथे संपर्क साधावा**

| | |
|---|---|
| **डॉक्टर** | **आहारतज्ञ** |
| **डॉक्टर** | **परिचारिका** |

Dr Sanjay Salunkhe